महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २७४ वे | दिनांक : ३०/०९/२०२६ | वार : बुधवार

## मुंबईत मातंग समाजाचा एल्गार; CSMT परिसरात आंदोलन, पोलिसांकडून धरपकड



**मुंबई :** अनुसूचित जातींच्या 13 टक्के आरक्षणाचे 'अ, ब, क, ड' असे उपवर्गीकरण करण्यात यावे, या प्रलंबित मागणीसाठी मातंग समाजाच्या वतीने मंगळवारी मुंबईत आक्रमक आंदोलन छेडण्यात आले. मूळ नियोजनानुसार हे आंदोलन आझाद मैदानावर होणार होते. मात्र, पोलिसांना गाफील ठेवून आंदोलकांनी थेट छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि महापालिका मुख्यालयाच्या परिसरात रस्त्यावर उतरून अचानक रास्ता रोको केला. यामुळे या परिसरातील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. मोठा पोलिस फौजफाटा तैनात असूनही आंदोलकांनी संपूर्ण परिसर व्यापून टाकल्याने मंत्रालयाकडे जाणारी वाहतूक विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली व पोलिस यंत्रणेची मोठी तारांबळ उडाली.सध्या पोलिसांकडून या आंदोलकांना रस्त्यावरून बाजूला हटवण्याचे आणि वाहतूक पूर्ववत करण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत, मात्र आंदोलक ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत. जोपर्यंत अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत शासनाकडून अधिकृत निर्णय जाहीर केला जात नाही, तोपर्यंत आम्ही मुंबईतून हटणार नाही, अशी ठाम भूमिका मातंग समाजाच्या आंदोलकांनी घेतली आहे. यामुळे मुंबईतील या परिसरामध्ये सध्या तणावाचे आणि वाहतूक कोंडीचे वातावरण आहे.कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये, या उद्देशाने कस्तुरबा मार्ग पोलिसांनी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास ही कारवाई केल्याचे स्पष्ट केले आहे. असे असले तरी, आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या प्रलंबित मागणीवर शासनाकडून जोपर्यंत ठोस निर्णय घेतला जात नाही, तोपर्यंत हे आंदोलन असेच सुरू ठेवण्याचा ठाम निर्धार मातंग समाजाच्या आंदोलकांनी व्यक्त केला आहे.मुंबईत आज आयोजित करण्यात आलेल्या मातंग समाजाच्या मोर्चात सहभागी होण्यापूर्वीच माजी आमदार रमेश कदम यांना कस्तुरबा मार्ग पोलिसांनी सकाळी सात वाजता स्थानबद्ध केले. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार त्यांना या मोर्चाला जाण्याची परवानगी नाकारण्यात आल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले. मात्र, प्रशासनाच्या या कारवाईमुळे मातंग समाजामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. रमेश कदम यांनी सांगितले की, मी आता थेट उपवर्गीकरणाचा शासन निर्णय (GR) घेण्यासाठीच आझाद मैदानाकडे रवाना झालो आहे; तरुणांनी मोठ्या संख्येने मैदानात जमावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच सकाळी मला पोलिसांनी घरातच स्थानबद्ध केले होते. या मनमानी कारवाईविरोधात माझे वकील तातडीने बोरीवली न्यायालयात गेले. न्यायालयात माझे वकील अर्ज दाखल करत असतानाच इकडे पोलिसांना आणि मला वरिष्ठ पातळीवरून फोन आला. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ 'तुम्ही जाऊ शकता' असे सांगत माझी सुटका केली, अशी माहिती त्यांनी दिली.

## राऊतांच्या आरोपांना मुंढेंचे प्रत्युत्तर; 'ACB कडे तक्रार करा'



**मुंबई :** अन्न व औषध प्रशासनाच्या (FDA) धडक कारवायांमुळे आयुक्त तुकाराम मुंढे चर्चेत असतानाच आता त्यांच्याच विभागातील काही अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचार आणि व्यावसायिकांकडून कथित वसुलीचे आरोप करण्यात आले आहेत. शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी मुंढे यांना पत्र लिहून FDAच्या काही अधिकाऱ्यांकडून हॉटेल, रेस्टॉरंट आणि इतर खाद्य व्यावसायिकांना धमकावून पैसे घेतले जात असल्याचा आरोप केला आहे. या आरोपांवर तुकाराम मुंढे यांनी भूमिका स्पष्ट करत, संबंधितांकडे ठोस माहिती किंवा पुरावे असतील तर ते विभागाकडे अथवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (ACB) द्यावेत, असे आवाहन केले आहे. संजय राऊत यांनी आपल्या पत्रात तुकाराम मुंढे यांच्या FDAमधील कारवाईचे कौतुकही केले आहे. भेसळयुक्त दूध, अ‍ॅनालॉग पनीर, हॉटेलच्या किचनमधील अस्वच्छता तसेच एक्सपायरी झालेल्या खाद्यपदार्थांविरोधात सुरू असलेल्या कारवाईमुळे ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सकारात्मक परिणाम होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मात्र, या कारवाईच्या आड काही अधिकारी व्यावसायिकांकडून पैसे उकळत असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे. संजय राऊत यांच्या म्हणण्यानुसार, FDAमधील काही पदनिर्देशित अधिकारी, सहाय्यक आयुक्त आणि अन्न सुरक्षा अधिकारी हॉटेल, रेस्टॉरंट तसेच क्विक-कॉमर्स व्यवसायांना परवाना निलंबित करण्याची भीती दाखवत असल्याचा आरोप आहे. कारवाईची नोटीस देऊन त्यावर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याऐवजी काही ठिकाणी थेट दबाव निर्माण करून पैसे मागितले जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. राऊत यांनी आपल्या पत्रात 'क्लोजिंग नोटीस'च्या नावाने कथित वसुलीचे दर वाढल्याचाही दावा केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, पूर्वी काही प्रकरणांमध्ये 10 ते 12 हजार रुपयांपर्यंतची रक्कम मागितली जात असल्याची चर्चा होती; आता ही रक्कम 75 हजार ते 2 लाख रुपयांपर्यंत गेल्याचे व्यावसायिक सांगत असल्याचा दावा त्यांनी केला आहे.तसेच बांद्रा आणि ठाणे येथील FDA कार्यालयांबाबतही त्यांनी गंभीर आरोप केले आहेत. हे सर्व दावे राऊत यांनी केले असून, त्यांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही. राऊत यांनी काही प्रकरणांमध्ये परवाना निलंबनाची कारवाई करण्यापूर्वी नोटीस, सुनावणी आणि त्यानंतर निलंबन अशी कायदेशीर प्रक्रिया पाळली जाते का, याचीही चौकशी करण्याची मागणी केली आहे. ग्राहकांच्या तक्रारींवर कारवाई करताना संबंधित तक्रार खरी आहे की बनावट, याची पडताळणी करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. या आरोपांवर प्रतिक्रिया देताना तुकाराम मुंढे यांनी संबंधित प्रकरणांची सविस्तर माहिती मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांकडून पैसे मागितले जात असल्याबाबत आपल्याकडे कोणतीही अधिकृत तक्रार आलेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. FDAमधील कोणत्या अधिकाऱ्याने पैसे मागितले, कोणत्या व्यावसायिकाकडे अशी मागणी करण्यात आली, कोणत्या ठिकाणी हा प्रकार घडला, यासंदर्भात ठोस माहिती किंवा पुरावे असल्यास ते प्रशासनाला द्यावेत, असे मुंढे यांनी म्हटले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० सप्टेंबर २०२६

## नवऱ्यानेच ढकलले बायकोला विहिरीत, अन् गुन्हा मात्र शेजाऱ्यांवर! खोट्या गुन्ह्यात अडकवलेल्या चार निष्पापांची न्यायालयाने केली जामिनावर सुटका

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** विहिरीच्या सामायिक पाण्याच्या हिश्श्यावरून झालेल्या तथाकथित वादादरम्यान स्वतःच्याच पत्नीला विहिरीत ढकलून देऊन, त्याच पत्नीमार्फत शेजाऱ्यांनी जीवघेणा हल्ला केल्याचा खोटा गुन्हा दाखल करवून अडकवलेल्या आणि अटकेत असलेल्या शेजाऱ्यांना परभणी मा. सत्र न्यायालयाने जामीन मंजूर करून मोठा दिलासा दिला आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की, जिंतूर तालुक्यातील जांभरून गावातील गट क्र. 142 मधील जमिनीच्या आणि विहिरीच्या पाण्याच्या वाटपावरून दोन गटांत दि. 7 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास तथाकथितरित्या वाद झाल्या प्रकरणी, नंदाबाई धोंडीबा आघाव यांच्या फिर्यादीवरून चारठाणा पोलीस ठाण्यात तब्बल आठ आरोपींवर बी.एन.एस. च्या कलम 109(1), 118(1), 118(2), 189(2), 190, 191(2), 191(3), 351(2), 351(3), 352, 115 अंतर्गत गु.र.नं. 170/2026 या क्रमांकाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींनी चाकू आणि रॉडने हल्ला करत जीवे मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीला विहिरीत ढकलून दिल्याचा आरोप एफ.आय.आर. मध्ये करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर चारठाणा पोलिसांनी तपासाचे चक्र वेगाने फिरवत चार आरोपींना अटक केली आणि त्यांना पोलीस कोठडीत घेऊन चौकशी केली. नंतर न्यायालयाने आरोपींना न्यायालयीन कोठडीत घेतल्याने तें परभणी येथील जिल्हा कारागृहात बंदिस्त होते.त्यानंतर, आरोपींनी त्यांच्या सुटकेसाठी ॲड. सुनिल बुधवंत यांच्या मार्फत परभणी सत्र न्यायालयात नियमित जामीन अर्ज दाखल केला. त्या अर्जावर सुनावणी दरम्यान, सरकारी पक्षातर्फे गुन्हा गंभीर असल्याने जामिनाला विरोध करण्यात आला. तसेच फिर्यादीच्या पतीनेही त्याच्या वकिलांमार्फत खाजगी वैद्यकीय प्रमाणपत्रे आणि फोटो न्यायालयात सादर करण्याचा प्रयत्न केला. मात्र, बचाव पक्षाच्या वकिलांनी या सर्व दाव्यांमधील फोलपणा उपलब्ध पुराव्यानिशी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला. ॲड. सुनिल बुधवंत यांनी न्यायालयासमोर युक्तीवाद करताना सांगितले की, सदरचा एफ.आय.आर. हा पूर्णपणे खोटा असून केवळ दिवाणी वादातून दाखल करण्यात आला आहे. खरा गुन्हेगार हा फिर्यादीचा पतीच असून त्यानेच पत्नीला विहिरीत ढकलले आहे, ज्याचा व्हिडिओ पुरावा उपलब्ध आहे, परंतू स्वतःला वाचवण्यासाठी फिर्यादीच्या पतीनेच पत्नीमार्फत आरोपींना या खोट्या गुन्ह्यात गोवले आहे. तसेच तथाकथित घटनेच्या दिवशी दुपारी नोंदवलेल्या जबाबावर सरकारी डॉक्टरांनी फिर्यादी पूर्णपणे शुद्धीत आणि जबाब देण्यास पात्र असल्याचा शेरा दिला होता. त्यामुळे नंतर सादर करण्यात आलेले खाजगी फोटो आणि अहवाल हे बनावट आणि न्यायालयाची दिशाभूल करणारे असल्याचे सांगितले.दोन्ही बाजूंचा प्रदीर्घ युक्तिवाद ऐकून आणि प्राथमिक दृष्ट्या उपलब्ध पुरावे, कागदपत्रे इत्यादी बाबी तपासून मा. परभणी सत्र न्यायालयाने अटकेत असलेल्या अरुण पालवे, बालासाहेब सांगळे, संजय पालवे आणि बापूराव सांगळे या चारही जणांची जामिनावर मुक्तता करण्याचा आदेश दि. 24 सप्टेंबर रोजी दिला. अडकवलेल्या आरोपींच्या वतीने ॲड. सुनिल बुधवंत यांनी सक्षमपणे बाजू मांडली आणि त्यांना ॲड. नरेश गव्हाणे, ॲड. अमोल सोनवणे, ॲड. महेश वाघमारे यांनी सहकार्य केले.

## डॉ. सौ. इं. भा. पा. महिला महाविद्यालयात कंपनी सेक्रेटरी (CS) करिअर अवेअरनेस कार्यक्रम संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इं. भा. पा. महिला महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे कंपनी सेक्रेटरी (CS) करिअर अवेअरनेस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींना कंपनी सेक्रेटरी या प्रतिष्ठित व्यावसायिक क्षेत्राची ओळख करून देणे तसेच या क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल या होत्या. यावेळी वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सुनंदा चक्रनारायण, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. रवींद्र परभाने, आयसीएसआय (ICSI) चे चेअरमन श्री. गौरव वर्मा तसेच त्यांचे सहकारी श्री. संजय भिंगारदिवे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. चक्रनारायण यांनी केले. त्यात त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश आणि हेतू विद्यार्थिनींना सांगितला.प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना श्री. गौरव वर्मा यांनी कंपनी सेक्रेटरी हा कंपनीचा कायदेशीर सल्लागार असून कंपनीवर लागू असलेल्या विविध कायद्यांचे पालन होत आहे की नाही, यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी सीएसची असते, असे सांगितले. कंपनीच्या संचालक मंडळानंतर कंपनी सेक्रेटरीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून या क्षेत्रात करिअरच्या भरपूर संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच सीएस होण्यासाठी आवश्यक पात्रता, अभ्यासक्रम आणि भविष्यातील करिअरच्या संधींची सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. व्याख्यानानंतर झालेल्या प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थिनींनी विविध शंकांचे निरसन करून घेतले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल यांनी सध्याच्या कॉर्पोरेट जगतात कायद्याचे पालन आणि सुशासन टिकवून ठेवण्यासाठी कंपनी सेक्रेटरीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगत विद्यार्थिनींनी या क्षेत्राचा करिअर पर्याय म्हणून गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सुनंदा चक्रनारायण, डॉ. सुनिता बाजपाई, डॉ. शिवाजी वाघमारे, प्रा. शरद देशमुख, डॉ. सरिता डापके यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अनन्या चव्हाण, प्रमुख पाहुण्यांचा परिचय कु. तनु तिवारी यांनी करून दिला, तर आभारप्रदर्शन कु. किमया जोशी यांनी केले.महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## धक्के भूकंपाचे.. ३३ वर्षांपूर्वीचे

३०सप्टेंबर १९९३ ची काळ रात्र सरून पहाट ..साखर झोपेतील पहाटस्वप्नांना सुरुवात होते आहे...विघ्नहर्ता विसर्जीत करून भक्त गाढ झोपेत अन्..पहाटे३.५५ ला..एकदम विचित्र आवाज..जाग येते न येते तोच घरे कोसळण्याचा आवाज..दगड मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचे आक्रोश..विजेचे खांब कोसळले अंधार..काही दिसत नाही, सुचत नाही नुसती थरथर..पुन्हा एकामागून एक धक्के..जीव वाचवण्यासाठी दूर जायचे तर लाईट बंद आणि घरे रस्त्यावर कोसळल्याने रस्तेही बंद.. मोकळ्या जागेत,अंगणात थांबून अडकलेल्या माणसांचे वाचवा वाचवाच्या आर्त हाका..स्वप्नांच्या राख रांगोळीच्या पार्श्वभूमीवर सूर्योदय..६.५चा धक्का बसला.काही वेळाने प्रशासनाकडे बातम्या..शासन,प्रशासन,स्वयंसेवी संस्था, यांच्या समन्वयातून अन्न, औषधे, तात्पुरता निवारा आदींचा तातडीने पुरवठा..मुख्यमंत्री मा .शरद पवार आणि मंत्रिमंडळ, आदरणीय शिवराज पाटील ,गृहमंत्री, भारत सरकार ,चैतन्यमूर्ती आदरणीय नगराध्यक्ष माधवराव पाटील काका, मा.आ.बसवराज पाटील, उस्मानाबाद जिल्ह्याचे माजी खासदार मा.रवींद्र गायकवाड उमरगा नगरीचे तत्कालीन अध्यक्ष मा.महादेवअप्पा दळगडे या मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली मदत आणि पुनर्वसन मार्गी लागले.हॉटेल मालक संघ कोल्हापूरचे मा.उज्ज्वल नागेशकर आणि सहकारी यांनी संपूर्ण गावासाठी १५दिवस मोफत जेवणाची व्यवस्था केली.नगर परिषद उमरगा,मुरूम YMCAमुंबई,मा. भास्करकुमार ,CASA,मुंबई,LWS कोलकताचे मा. पी. जे. चाको,राजेश, भारतीय जैन संघटना ,पुणे, मा.डॉ.नीलमताई गोऱ्हे,मा. विद्या बाळ,मुंबई,तत्कालीन उस्मानाबाद जिल्हा अधिकारी मा.एस. चोक्कलिंगम,मुख्य कार्यकारी अधिकारी मा.राजीव जलोटा, विद्यमान मुख्यमंत्र्यांचे मुख्य सचिव मा.भूषण गगराणी,पोलिस अधीक्षक मा.डॉ.के.व्यंकटेशम् डॉ.भूषणकुणार उपाध्याय,पोलिसअधिक्षक,लातूर, स्वामी नारायण संस्था, मुंबई, जनकल्याण समितीकडून मा.आ. सुजित ठाकूर,मा. बाळासाहेब क्षीरसागर,लातूरच्या युनिक सर्व्हिस ट्रस्टचे मा. विनायकराव पाटील,सोलापूरचे कॉ.नारायणराव आडम प्रबोधन केंद्र,माजी आमदार कॉ. आडम मास्टर,ऍड. एम. एच. शेख,स्पर्श मुंबईच्या मा.विपुला कादरी,मा.रमाकांत जोशी, मानवलोक,अंबाजोगाईचे डॉ.द्वारकदास बाबूजी लोहिया, शैलाभाभी लोहिया,उपेंद्र टण्णू,अंनिस, राष्ट्र सेवा दल,अंबाजोगाईचे नगराध्यक्ष दिवंगत अरूण राव पुजारी,निलग्यांचे डॉ.उत्तमराव तळीखेडकर, लोकमत सोलापूरचे मा.स.सो.खंडाळकर या मान्यवरांनी आम्हाला केलेली अनमोल मदत आज पुन्हा स्मरते आहे.जनजीवन पूर्वपदावर येताच पक्के घरे,रस्ते आदी सुविधा सह जगातील आदर्श पुनर्वसन..आमचे विस्कटलेले संसार आणि उद्धवस्त झालेले गाव पुन्हा मांडून देणाऱ्या सर्वांचे आभार!

**डॉ. रमाकांत पाटील,**
**कलदेव निंबाळा,**
**ता.उमरगा, जिल्हा- धाराशिव.**

Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A. (मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० सप्टेंबर २०२६


## जालनाच्या जेईएस महाविद्यालयात नोकरी महोत्सवाचे आयोजन

**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जालना येथील जेईएस महाविद्यालय येथे नोकरी महोत्सव, नोंदणी आणि सहभाग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयीन युवकांना पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षणानंतर करिअरच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठीजालना जिल्ह्यातील तरुणांना करिअरच्या घडवण्यासाठी, उत्तम नोकरी आणि प्लेसमेंटच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट सेल, जेईएस महाविद्यालय जालना तर्फे 'नौकरी महोत्सवाचे' आयोजन दि.०१ ऑक्टोबर २०२६ राजी करण्यात येणार आहे . जालना जिल्ह्यातील युवकांनी दिलेल्या गुगल फॉर्मद्वारे लवकर नोंदणी करणे आवश्यक आहे, असे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या ठिकाणी १ऑक्टोबर २०२६ रोजी सुद्धा सकाळी नऊ वाजता नोंदणी करू शकतातजे ई एस महाविद्यालयाचे बीए, बीकॉम, बीएस्सी, बिसिए, एम. ए , एम. कॉम, एम. एम.एस्सी. चे सर्व विद्यार्थीसाठी तसेच जालना जिल्ह्यातील बेरोजगार युवकांसाठी ही सुवर्णसंधी असल्याचे ट्रेनिंग प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. डॉ. राजेश सरकटे आणि सर्व सदस्यांनी सांगितले.

## कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालय,वुशू स्पर्धेत संभाजीनगर विभागातून प्रथम.



**(शिरूर कासार) :** महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे.यांच्या अधिनस्त छत्रपती संभाजीनगर विभागीय क्रीडा परिषद आयोजित 'वुशू' या मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.ही मैदानी स्पर्धा ४८ किलो वजन गटातील मुलींसाठी होती.या स्पर्धेमध्ये कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मुलींनी सहभाग नोंदविला होता.या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर विभागातून अनेक नामांकित महाविद्यालयाने सहभाग नोंदविला होता.मात्र शिरूर (का.)जि.बीड येथील कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालयातील कु.नेटके आदिती कालिदास या विद्यार्थीनीने 'प्रथम क्रमांक' पटकावून बाजी मारली आहे.यामुळे तिची निवड राज्यस्तरावर होणाऱ्या 'वुशू' स्पर्धेत खेळण्यासाठी झाली आहे.कनिष्ठ महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक प्रा.बाळासाहेब खटाणे यांनी मुलींच्या 'वुशू' या स्पर्धेची तयारी अतिशय कौशल्यपूर्ण पद्धतीने करून घेतली होती.यामुळे कु.आदिती नेटके या विद्यार्थिनीने विभागीय स्तरावर 'प्रथम क्रमांक' पटकावून तिला राज्यस्तरीय स्पर्धेत जाण्याचा मान मिळाला आहे.तसेच तिने 'छत्रपती संभाजीनगर विभागात' कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालयाच्या नावाचा लौकीक करून दाखविला आहे.यासाठी तिचा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.यामुळे आदर्श शिक्षण संस्थेचे,सचिव तथा मा.जयदत्त(अण्णा)क्षीरसागर मा.रोहित (दादा) क्षीरसागर साहेब,प्रशासकीय अधिकारी डॉ.राजूजी मचाले साहेब, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी मा.योगेश पवार साहेब,कार्यवाहक मा.एम.ए.राऊत सर प्राचार्य केशव भांगे साहेब तसेच उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी परिसरातील क्रीडाप्रेमी व सर्व विद्यार्थी यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचे आणि विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.

## आदर्श सरपंच सौ. ज्योती निवृत्ती शेळके यांचा ग्रामस्थांच्या वतीने जाहीर सत्कार



**खेडा :** गावाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहून विविध उपक्रमांच्या माध्यमातून गावाच्या प्रगतीला दिशा देणाऱ्या सौ. ज्योती निवृत्ती शेळके यांना नुकताच नालंदा ऑर्गनायझेशन आयोजित राज्यस्तरीय महाराष्ट्र ग्रामगौरव सन्मान सोहळा २०२६ मध्ये 'आदर्श सरपंच' या पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल राज्यस्तरावर घेतली गेल्याने खेडा गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.पुणे येथील पत्रकार भवनात आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सन्मान सोहळ्यात सौ. ज्योती निवृत्ती शेळके यांना मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान प्रदान करण्यात आला. गावाच्या विकासासाठी केलेले प्रयत्न, लोकाभिमुख कामकाज, ग्रामस्थांशी समन्वय आणि विविध विकासात्मक उपक्रमांमध्ये घेतलेला पुढाकार याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.सरपंचपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर गावातील विविध प्रश्नांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहत ग्रामस्थांच्या सहभागातून विकासकामांना चालना देण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी लोकसहभाग, सामाजिक बांधिलकी आणि विकासाभिमुख दृष्टिकोन या माध्यमातून त्यांनी आपल्या कार्याची वेगळी ओळख निर्माण केली आहे.'आदर्श सरपंच' पुरस्कार मिळाल्यानंतर ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांच्या वतीने सौ. ज्योती शेळके यांचा जाहीर सत्कार करण्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्यात त्यांच्या कार्याचा गौरव करून पुढील सामाजिक व विकासात्मक वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात येणार आहेत.गावच्या लोकप्रतिनिधीला राज्यस्तरीय पुरस्कार मिळणे ही केवळ सौ. ज्योती शेळके यांचीच नव्हे, तर संपूर्ण खेडा गावासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. त्यांच्या या सन्मानामुळे गावातील विकासकामांना आणि सामाजिक उपक्रमांना नवी प्रेरणा मिळेल, असा विश्वासही ग्रामस्थांनी व्यक्त केला.

## ज्ञानदा संस्थेच्या माध्यमातून चौरेचाळीस विद्यार्थ्यांना रोजगार



**कन्नड (अरुण थोरात) :** आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अप्रेंटिसशिपच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ज्ञानदा कौशल्य विकास संस्था (आयटीआय कॉलेज), कन्नड यांच्या वतीने अप्रेंटिसशिप सुविधा व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे स्वामी समर्थ बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे सचिव उदयसिंह गायकवाड, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य संतोष मतसागर, शिवाजी कॉलेजचे प्रा. योगिराज सोमवंशी इंन्शुरन्स कंपनी चे मॅनेजर सुभाष घाटखाने सर तसेच इंड्युरन्स टेक्नॉलॉजी चे श्रीकांत सिसोदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानदा कौशल्य विकास संस्थेचे अध्यक्ष विलास इंगळे हे होते. या मार्गदर्शन कार्यक्रमात आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अप्रेंटिसशिपची प्रक्रिया, उपलब्ध संधी, आवश्यक कागदपत्रे तसेच उद्योग क्षेत्रातील रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले व एकूण 44 विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ देण्यात आला व जवळपास सोळा ते बावीस हजार रुपये प्रति महिना मानधन विदयार्थ्यांना देण्यात आले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या प्राचार्य अमृता इंगळे तसेच प्रशिक्षक सचिन पिंपळे, आशिष मोरे, राहुल गायकवाड, सुदर्शन गायके, संगीता देशमुख, श्रीमती दांडगे यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी झाला

# पितृपक्ष : श्रद्धेचा संस्कार की स्मरणाचा इव्हेंट

*या लेखात पितृपक्ष परंपरेतील श्रद्धा, कृतज्ञता आणि पूर्वजांच्या स्मरणाचा मूळ अर्थ स्पष्ट केलेला आहे. तसेच आधुनिक काळातील सोशल मीडिया, दिखावा आणि व्यापारीकरणामुळे स्मरणाचे 'इव्हेंट'मध्ये होणारे रूपांतरही अधोरेखित केलेले आहे. पूर्वजांनी दिलेले ज्ञान, संस्कार, माणुसकी, पर्यावरणीय जाणिवा आणि कौटुंबिक वारसा पुढे नेणे हेच खरे पितृस्मरण असल्याचा संदेश या लेखातून मांडलेला आहे.* भारतीय संस्कृती ही केवळ सण-उत्सवांची संस्कृती नाही, तर ती स्मृती, कृतज्ञता आणि संस्कारांची प्रदीर्घ परंपरा आहे. आपली ज्ञानपरंपरा आपल्या अस्तित्वामागे असलेल्या अनेक अदृश्य हातांची जाणीव करून देणारी परंपरा आहे. पितृपक्ष अशाच कृतज्ञतेच्या भावनेचा अर्थपूर्ण आविष्कार आहे. दरवर्षी पितृपक्ष आला की, आपल्याला अचानक आपल्या पूर्वजांची आठवण येते. मग हळूच वरच्या माळ्यावर किंवा कपाटातील पडद्याआड ठेवलेले जुने फोटो बाहेर येतात. चेहऱ्यावरची, बुद्धीवरची धूळ दुर्लक्षित करून आपण फोटो स्वच्छ करून फोटोला हार घातला जातो. दोन मिनिटे मौन पाळून पितराला नैवेद्य वाढतानाच हळूच मोबाईल बाहेर येऊन फोटोचे छायाचित्र काढले जाते. पितरांचे जेवण होईपर्यंत समाज माध्यमाचे खाते लॉगीन करून 'तुमची उणीव कधीच भरून निघणार नाही..!', 'तुमचे आशीर्वाद असेच सदैव आमच्यावर राहू देत..!' अशा पोस्ट केल्या जातात. त्या पोस्टला जवळच्या लोकांकडून उसनवारीने काही लाईक्स व दोन-चार भावनिक प्रतिक्रिया आल्याशिवाय पितृपक्षाचा आधुनिक विधी संपन्न झाला असे आपल्याला वाटतच नाही. कधी कधी प्रश्न पडतो की, आपण पितृपक्षातील श्राद्ध किंवा संस्कार पाळतोय की त्या श्रद्धेचे 'इव्हेंट मॅनेजमेंट' करतोय? पाश्चिमात्य संस्कृतीमुळे आज प्रत्येक भावनेला एक 'डे' साजरा केला जातो. आईला, वडिलांना, पर्यावरणाला डे आणि पूर्वजांना पंधरवडा..! आपल्या भावनांचे कॅलेंडर हल्ली इतके भरले की आपल्याला जगण्यासाठी वेळच उरलेला नाही. पूर्वी पितृपक्ष स्मरण, संयम, कृतज्ञता आणि पिढ्यांमधील नाते दृढ करण्याचा एक संस्कार होता. आज या संस्काराभोवती सजावट, फोटो, भव्य आयोजन आणि प्रसिद्धीची भर पडलेली आहे. त्यातील श्रद्धा कमी झाली असे मुळीच नाही; पण तिचे प्रदर्शन मात्र प्रचंड वाढले आहे. भारतीय ज्ञानपरंपरेत पितृस्मरणाचा अर्थ केवळ मृत व्यक्तीला आठवण्याएवढा सीमित नाही; तर आपल्या आधीच्या पिढ्यांकडून जीवन, संस्कार, अनुभव, ज्ञान, भाषा, परंपरा आणि जगण्याची पद्धती घेतलेली असते. त्याचे ऋण फेडणे म्हणजे 'पितृऋण' आहे. अर्थात वर्षातील एखाद्या दिवशी श्राद्धाचा विधी करून मोकळे होणे नव्हे; तर मिळालेला वारसा आणि मागील श्रद्धेचा संस्कार पुढे नेणे आहे. 'मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव।' या उपनिषदातील प्रसिद्ध वचनात भारतीय जीवनदृष्टीतील माता, पिता आणि आचार्याविषयी कृतज्ञतेचा मोठा आशय दडलेला आहे. ज्यांनी आपल्याला जन्मास घातले, घडवले त्यांचे स्मरण व ज्यांच्याकडून आपल्याला ज्ञान मिळाले त्यांचा आदर करणारी आपली परंपरा आहे. पण आज आपण 'पितृपक्ष आला की पितरांना आठवायचे!' इतकाच त्याचा अर्थ घेतो. म्हणून पितृऋण म्हणजे तर्पणाच्या पलीकडे जाऊन पूर्वजांनी दिलेल्या जीवनदृष्टी, ज्ञान, संस्कार आणि मूल्यांचे भान ठेवणे हे नव्याने समजून घेणे आवश्यक आहे. जुन्या काळात घर म्हणजे केवळ चार भिंती नसून आजीच्या ओव्यांमध्ये घराचे भावविश्व; आजोबांच्या कथांमध्ये गावाचा इतिहास; आईच्या पदार्थांत पिढ्यांची चव आणि वडिलांच्या शिकवणीत आयुष्यभराचा अनुभव होता. आज घरात स्मार्ट टीव्ही, स्मार्टफोन सगळे स्मार्ट आहेत; पण घरातील माणसांशी संवाद साधण्यासाठी 'स्मार्ट' वेळेची वाट पहावी लागत आहे. ज्ञान आणि मूल्य घरात आहेत; शोध मात्र इंटरनेटवर सुरू हे..! हा प्रश्न केवळ कुटुंबापुरता नाही; तर तो आपल्या सामाजिक वारशाबाबतही आहे. भारतीय जीवनात 'मी' पेक्षा 'आपण' ला जास्त महत्त्व आहे. शेजाऱ्याच्या सुख-दुःखात सहभागी होणे, संकटात एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे, सामूहिक सण साजरे करणे हा जगण्यातील संस्कार आहे. कारण ही परंपरा सहअस्तित्व शिकविणारी परंपरा आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे- "जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले। तोचि साधु ओळखावा। देव तेथेंचि जाणावा॥" आपल्या आसपासच्या 'रंजल्या-गांजलेल्यांना' आपण किती आपले मानतो आणि किती आपले वाटतो? पूर्वजांच्या चिरशांतीसाठी प्रार्थना करताना आपल्या आजूबाजूच्या जिवंत माणसांच्या दुःखाकडे दुर्लक्ष केल्याने आपली श्रद्धा कृतीपासून दूर जाते. आपल्या पूर्वजांच्या जीवनात निसर्ग हा 'संसाधन' नव्हता; तर तो माणसांचा सगा सोयरा होता. "वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे।" या एका ओळीत माणूस आणि निसर्ग यांच्यातील आत्मीयतेचे नाते सामावलेले दिसते. नदी माता, भूमी माता, पूजनीय वृक्ष अशा प्रतिमामागे केवळ धार्मिक भावना नाहीत, तर निसर्गाशी जबाबदारीचे नाते जोडणारी जीवनदृष्टी आहे, हे समजून घेणे आवश्यक आहे. आज आपण पर्यावरण दिनाला रोप लावतो, फोटो काढतो, पोस्ट करतो पण दुसऱ्या दिवशी पाणी कोण देणार? हा प्रश्न त्या लावलेल्या रोपालाच पडतो. पूर्वजांनी विहीर दिली; आपण त्याची बोअरवेल केली. त्यांनी सावली जपली; आपण पार्किंग केले. त्यांनी पाण्याला तीर्थ मानले; आपण बाटलीचा ब्रँड केला. म्हणून या पितृपक्षातील तर्पणाला जर आपण पर्यावरणीय जाणिवेची जोड दिली तर आपल्या स्मरणाला कृतीचा आधार मिळेल. इथे पूर्वजांनी काय कमावले यापेक्षा काय जपले? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. पूर्वज कोणती मूल्ये जगली? कष्टाचे आणि श्रमाचे काय महत्त्व होते? ते निसर्गाशी कसे वागले? त्यांनी समाजाशी कसे संबंध ठेवले? कठीण काळात कुटुंब कसे सांभाळले? पुढच्या पिढीला ज्ञान कसे दिले? या प्रश्नांची उत्तरे शोधणे आणि पुढच्या पिढीला समजून सांगणे म्हणजे पितृस्मरण. आज पितृपक्षासाठी तयार संच, साहित्य, सेवा, जाहिराती आणि संदेश आहेत..! म्हणजे पूर्वजांचे स्मरणही आता 'रेडीमेड' डब्ब्यात पॅक स्वरुपात उपलब्ध आहे. बाजाराने श्रद्धेलाही मार्केटिंग किटमध्ये बांधले आहे. मात्र बरे झाले की, संस्कार रेडीमेड मिळत नाहीत. कारण संस्कार हे दररोजच्या जगण्यातून सिद्ध करावे लागतात. श्रद्धा वैयक्तिक असते; पण तिच्या भोवतीचा बाजार सार्वत्रिक असल्याने विधीचे व्यापारीकरण झाले. म्हणून श्रद्धेला दोष देण्याचे कारण नाही; प्रश्न एवढाच की, या बाजाराने आपल्या श्रद्धेचे श्राद्ध करून तिचा अर्थ बदलू नये. फोटोला हार घालणे सोपे आहे; जिवंत आई-वडिलांच्या आयुष्याला वेळ देणे कठीण आहे. जिवंत माणसांच्या मनाला अशांत करून पितरांना शांती मिळावी म्हणून मंत्र म्हटले जातात. म्हणून पितृपक्षाला कर्मकांड किंवा केवळ अंधश्रद्धा म्हणून पाहणे अपुरे ठरेल. पितृपक्षात तर्पण करावे, श्राद्ध करावे, श्रद्धेनुसार परंपरा पाळावी; पण त्यासोबत घरातील ज्येष्ठांच्या आठवणी ऐकाव्यात, कुटुंबाचा इतिहास मुलांना सांगावा, आजीच्या ओव्या लिहून ठेवाव्यात, आजोबांचे अनुभव रेकॉर्ड करावेत, घरातील जुन्या वस्तूंमागची किंवा प्रथांमागची कथा जाणून घ्यावी, हे ज्ञानाचे खरे तर्पण आहे. मोठ्या वृक्षाची मुळे दिसत नाहीत म्हणून त्याचे अस्तित्व नाकारता येत नाही. आपण त्या मोठ्या वृक्षाची फांदी आहोत. त्याची मुळे कोरडी पडली तर फांदी कितीही हिरवी दिसत असली तरी तिचे भविष्य धोक्यात येतेच. आजच्या इव्हेंट संस्कृतीत आपण ती फांदी सजवण्यात इतके रमलो आहोत की, मुळांना पाणी देणेच विसरत चाललो आहोत. म्हणून यंदाच्या पितृपक्षात स्वतःला एकच प्रश्न विचारूया- आपण केवळ आपल्या पूर्वजांच्या स्मृतीचा फोटो पुढे नेणार आहोत, की संस्काराचा वारसाही? श्रद्धा एका दिवसाची असू शकते; संस्कार मात्र पिढ्यान्‌पिढ्यांचे असतात. मुळांना केवळ पाणी अर्पण करू नका; मुळांनी दिलेल्या संस्काराच्या सावलीत स्वतःला घडवा आणि पुढच्या पिढीसाठी नवी पालवी तयार करा. आपल्या पूर्वजांनी जपलेले मूल्य पुढे नेणे म्हणजे त्यांच्या स्मृतीला सर्वांत मोठी आदरांजली आहे. शिकवलेली माणुसकी जगणे आणि त्यांच्या चांगल्या कार्याला नव्या रूपाने आकार देणे. म्हणून पितृपक्षाला केवळ 'इव्हेंट' म्हणून साजरा न करता तो पिढ्यान्‌पिढ्यांमधील संवादाचा संस्कार बनवूया. कारण पूर्वजांचे स्मरण म्हणजे फक्त विधी नाही; तो स्वतःच्याच मुळांचा पुनर्शोध आहे. म्हणून तर्पणाच्या पाण्याबरोबर स्मृती वाहून जाऊ देऊ नका; त्या स्मृतीतले ज्ञान, संस्कार आणि माणुसकी पुढे वाहू द्या...



**- डॉ. वासुदेव ऊगले**
विभागप्रमुख,
मराठी भाषा व वाङ्मय विभाग,
श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालय,
जालना
vasnt.ugale@gmail.com






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० सप्टेंबर २०२६


## बारबाला आणि देवदासी - देहाचा दोष कोणाचा?

समाज स्त्रीकडे पाहताना तिच्या चेहऱ्याकडे कमी आणि तिच्या देहाकडे जास्त पाहतो, ही आपल्या समाजाची सर्वात मोठी शोकांतिका आहे. एखादी स्त्री बारमध्ये नाचते म्हणून तिच्या संपूर्ण आयुष्याचा निकाल लावला जातो; एखादी स्त्री देवदासी म्हणून ओळखली जाते म्हणून तिच्या आयुष्यावर प्रश्नचिन्ह उभे केले जाते. पण त्या स्त्रीच्या डोळ्यांत डोकावून तिची कहाणी ऐकण्याची तयारी किती जणांची आहे? तिच्या हातात पर्याय होते की नव्हते, तिच्या पोटात दोन दिवस अन्न गेले होते की नव्हते, तिच्या मुलाच्या शिक्षणाची फी कोण भरणार होती, घराने तिला स्वीकारले होते की रस्त्यावर सोडले होते—हे प्रश्न समाज विचारतो का?*स्त्रीचा देह दिसतो; पण तिच्यामागची भूक, असहायता आणि अश्रू दिसत नाहीत.*बारबाला हा शब्द ऐकला की अनेकांच्या डोळ्यासमोर केवळ बार, नृत्य, पैसा आणि पुरुष येतात. पण त्या स्त्रीचे आयुष्य तिथून सुरू झालेले नसते. तिच्या मागे एखादे तुटलेले कुटुंब असू शकते, प्रेमाच्या नावाखाली झालेली फसवणूक असू शकते, लग्नाचे आमिष दाखवून वापरून सोडून देणारा पुरुष असू शकतो, घरच्यांनी समाजाच्या भीतीने घराबाहेर काढलेली मुलगी असू शकते किंवा स्वतःच्या आणि आपल्या मुलाच्या पोटासाठी संघर्ष करणारी आई असू शकते. प्रत्येक बारबालेची कथा अशीच असते असे नाही; पण प्रत्येक स्त्रीला एकाच मापाने मोजणे हा निश्चितच अन्याय आहे.काही स्त्रिया परिस्थितीमुळे अशा व्यवसायात येतात, काही आर्थिक कारणांनी, काहींच्या आयुष्यात फसवणूक असते, तर काही जणी स्वतःच्या निर्णयानेही हे काम स्वीकारतात. पण कोणत्याही परिस्थितीत *तिच्या व्यवसायामुळे तिच्या माणूसपणाचा अधिकार संपत नाही.*आपण पुरुषाच्या चुकीला अनेकदा 'चूक' म्हणतो आणि स्त्रीच्या परिस्थितीला 'चरित्र' म्हणतो. हा समाजाचा दुहेरी मापदंड नाही का?एका मुलीला प्रेमाच्या नावाने जवळ करणारा पुरुष तिला लग्नाचे स्वप्न दाखवतो. तिच्यावर विश्वास ठेवायला लावतो. तिच्या भावनांचा वापर करतो आणि नंतर तिला सोडून देतो. समाज मात्र त्या पुरुषाला शोधण्यापेक्षा त्या मुलीच्या चारित्र्याचा पंचनामा सुरू करतो. घरच्यांना 'घराण्याची बदनामी' दिसते; पण त्या मुलीचे उद्ध्वस्त झालेले आयुष्य दिसत नाही.आणि मग प्रश्न पडतो—*जिच्यावर अन्याय झाला, शिक्षा तिलाच का?*देवदासी परंपरेचा प्रश्न याहून अधिक गुंतागुंतीचा आहे. 'देवाला सोडलेली दासी' किंवा 'देवाला अर्पण केलेली मुलगी' असा त्याचा धार्मिक संदर्भ सांगितला जातो. इतिहासात काही प्रदेशांत मुलींना देवतेशी प्रतीकात्मक विवाह किंवा अर्पण करण्याची प्रथा होती. परंतु कालांतराने या प्रथेभोवती निर्माण झालेल्या सामाजिक आणि लैंगिक शोषणामुळे अनेक मुलींचे जीवन उद्ध्वस्त झाले. त्यामुळे देवदासी परंपरेचा विचार केवळ धार्मिक शब्दांच्या अर्थाने करून चालत नाही; तिच्यामागे असलेली *जात, गरिबी, पितृसत्ता, लैंगिक शोषण आणि सामाजिक असुरक्षितता* यांचा विचार करावा लागतो.इथेच एक कठोर प्रश्न उभा राहतो—जर एखाद्या मुलीला 'देवाला अर्पण' केले असे म्हणत असू, तर तिच्या पुढच्या आयुष्यात तिच्या शरीरावर अधिकार कोणाचा राहतो? तिच्या मुलांचा जन्म कसा होतो? तिच्या मुलांची जबाबदारी कोण घेतो? आणि जर त्या मुलीलाच समाजाने देवाच्या नावाने एका व्यवस्थेत ढकलले असेल, तर त्या व्यवस्थेचा फायदा घेणाऱ्या पुरुषांना समाज प्रश्न का विचारत नाही?*देवाच्या नावाने अर्पण केलेली मुलगी, पण तिच्या आयुष्याची जबाबदारी घेणारा देवाच्या नावावरचा समाज कुठे असतो?*हा प्रश्न धर्मावर आघात करण्यासाठी नाही; तर धर्माच्या नावाने स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाचा हिशेब मागण्यासाठी आहे.देवदासींच्या मुलांचा प्रश्नही अत्यंत गंभीर आहे. एखादी स्त्री देवाला अर्पण केली गेली म्हणून तिचे मातृत्व संपत नाही. ती स्त्री आहे, तिच्या शरीरावर जैविक प्रक्रिया आहेत, तिच्या आयुष्यात पुरुष येऊ शकतात, तिची मुले होऊ शकतात. त्या मुलांना समाज कोणत्या नजरेने पाहतो? त्यांचा पिता कोण, त्यांची ओळख काय, त्यांचे भविष्य काय—हे प्रश्न तिच्या कपाळावर लावलेल्या 'देवदासी' या शब्दापेक्षा कितीतरी मोठे आहेत.पिढ्यानपिढ्या एखादी प्रथा चालत राहते, तेव्हा फक्त त्या स्त्रियांना दोष देणे म्हणजे मूळ प्रश्नापासून पळणे होय. *पिढ्या तयार करणारी व्यवस्था कोणती आहे, त्या व्यवस्थेला आर्थिक आधार कोण देतो, त्या स्त्रियांचा वापर कोण करतो आणि त्यांना त्या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी समाजाने काय केले—हे विचारले पाहिजे.*बारबाला आणि देवदासी यांच्यात फरक आहे. बारमध्ये काम करणारी स्त्री कोणत्याही धार्मिक अर्पणाच्या प्रथेतून आलेली असेलच असे नाही. तिचे काम, तिची परिस्थिती आणि तिची वैयक्तिक निवड वेगवेगळी असू शकते. देवदासी परंपरेचा उगम मात्र धार्मिक-सामाजिक प्रथांमध्ये आहे. त्यामुळे दोघींना एकाच चौकटीत बसवणे योग्य नाही.पण एक समान धागा दिसतो—*स्त्रीच्या देहावर समाजाचा अधिकार गाजवण्याची मानसिकता.*बारबालेकडे ग्राहक म्हणून पाहणारा पुरुष तिच्या परिस्थितीचा फायदा घेतो; देवदासीच्या बाबतीत धार्मिक किंवा सामाजिक परंपरेच्या नावाखाली तिच्या असुरक्षिततेचा फायदा घेणारी व्यवस्था असू शकते. फरक एवढाच की एका ठिकाणी व्यवहार अधिक उघड दिसतो आणि दुसऱ्या ठिकाणी त्याला परंपरेचे, श्रद्धेचे किंवा सामाजिक मान्यतेचे आवरण मिळू शकते.म्हणून प्रश्न बारबालेचा किंवा देवदासीचा नाही. *प्रश्न त्या पुरुषी आणि सामाजिक मानसिकतेचा आहे जी स्त्रीचा देह वापरते आणि नंतर त्याच स्त्रीला दोष देते.*आपण बारमध्ये जाणाऱ्या पुरुषाला कधी विचारतो का—तो तिथे का गेला? त्या स्त्रीच्या शरीराकडे पाहणाऱ्या नजरेची जबाबदारी कोणाची? तिच्यावर पैसे खर्च करणाऱ्या पुरुषाच्या नैतिकतेचा विचार का होत नाही? आणि दुसरीकडे देवदासीच्या बाबतीत तिच्या शरीराचा वापर करणाऱ्या पुरुषाला समाज कोणत्या नावाने ओळखतो?स्त्री एकटीने या व्यवस्थेला जन्म दिलेला नाही.म्हणूनच 'ती अशी का झाली?' हा प्रश्न विचारण्यापेक्षा *'तिला अशी होण्याची वेळ का आली?'* हा प्रश्न विचारला पाहिजे.तिच्या हातात शिक्षण होते का? रोजगार होता का? सुरक्षित घर होते का? संकटात उभे राहणारे आई-वडील होते का? फसवणूक झाल्यावर कायदेशीर मदत होती का? पतीने सोडून दिल्यावर मुलांसह जगण्याचा आधार होता का? समाजाने तिला पुन्हा उभे राहण्याची संधी दिली का?जर या प्रश्नांची उत्तरे 'नाही' असतील, तर केवळ तिच्या देहाकडे बोट दाखवणे म्हणजे आपल्या सामाजिक अपयशावर पडदा टाकणे आहे.*कोणतीही स्त्री जन्माला येताना बारबाला म्हणून जन्माला येत नाही. कोणतीही मुलगी जन्माला येताना देवदासी होण्याची इच्छा घेऊन येत नाही.*परिस्थिती, परंपरा, गरिबी, फसवणूक, शोषण, सामाजिक बहिष्कार आणि पुरुषसत्ताक व्यवस्था—या अनेक गोष्टी मिळून तिच्या आयुष्याला दिशा देऊ शकतात. काही स्त्रिया या साखळ्या तोडतात; काही संघर्ष करत राहतात; काही त्या व्यवस्थेत अडकून राहतात.पण त्या प्रत्येकाच्या डोळ्यांत एकच प्रश्न असतो—*“माझा दोष नेमका काय?”*आपण समाज म्हणून त्या प्रश्नाचे उत्तर देण्याची वेळ आली आहे.स्त्रीला तिच्या भूतकाळावरून नाही, तर तिच्या माणूसपणावरून पाहिले पाहिजे. तिला दया नको; तिला संधी हवी. तिला उपदेश नको; तिला सुरक्षितता हवी. तिला अपमान नको; तिला सन्मान हवा. आणि तिच्या मुलांना आईच्या भूतकाळाची शिक्षा नको; त्यांना शिक्षण, ओळख आणि भविष्य हवे.देवाच्या नावाने असो किंवा पैशाच्या नावाने—*स्त्रीच्या शरीराचा वापर करून नंतर तिच्याच चारित्र्यावर प्रश्नचिन्ह लावणारा समाज स्वतःच्या आरशात कधी पाहणार?*बारबाला असो किंवा देवदासी—तिच्या देहाकडे पाहण्यापूर्वी तिच्या डोळ्यांत पाहा. तिथे कदाचित तुम्हाला वासना दिसणार नाही; तिथे *भूक, भीती, फसवणूक, मातृत्व, अपमान, जगण्याची धडपड आणि माणूस म्हणून जगण्याची एक साधी इच्छा* दिसेल.आणि त्या दिवशी कदाचित आपण प्रश्न विचारणे थांबवू—*“ही स्त्री अशी का आहे?”*आणि प्रश्न विचारायला सुरुवात करू—*“आपला समाज तिला अशा अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी काय करणार आहे?”*कारण स्त्रीच्या देहाला दोष देणे सोपे आहे;*पण तिच्या अश्रूंची जबाबदारी स्वीकारणे ही खरी माणुसकी आहे.




**प्रा.डॉ.सतिश लिला नामदेव दोडके ठाणे**


## सांगा मुक्त कसे व्हावे!

पावसाविना दुष्काळ,
अख्या महाराष्ट्रात पडले.
हे मेघाराजा सांग कुठे,
नभात काळे ढग अडले. १

असा कसा निष्ठुर होऊन,
ढगांना दूर दूर पळवितो.
जगाच्या पोशिंद्याला असे,
पीक सारे जाळून रडवितो. २

दुष्काळाचे संकट पाहून,
मनाला लागली हुरहूर.
दूरदूर पर्यंत पडत नाही,
आता कुठे पाऊस भुरभूर. ३

बळीराजाला पडला प्रश्न,
मुलांचे शिक्षण कसे करावे.
पिक पाणी करपून गेले,
काय विकून फीस भरावे. ४

दुष्काळाच्या संकटातून,
सांगा मुक्त कसे व्हावे.
सावकाराकडून घेतलेल्या,
कर्जाचे हप्ते कुठून द्यावे. ५




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० सप्टेंबर २०२६


## देवगिरी किल्ल्याच्या ऐतिहासिक वैभवाची विद्यार्थिनींनी घेतली अनुभूती




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त विद्यार्थिनींमध्ये ऐतिहासिक वारशाविषयी जाणीव, इतिहासाविषयी आस्था आणि अभ्यासक्रमाशी संबंधित प्रत्यक्ष अनुभव निर्माण व्हावा, या उद्देशाने देवगिरी किल्ला येथे ऐतिहासिक सहलीचे आयोजन करण्यात आले.या ऐतिहासिक सहलीमध्ये महाविद्यालयातील अकरावी, बारावी, बीसीए तसेच बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थिनींनी देवगिरी किल्ल्याच्या ऐतिहासिक वास्तू, स्थापत्यशैली, संरक्षणव्यवस्था तसेच तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. मराठवाड्याच्या इतिहासातील देवगिरी किल्ल्याचे अनन्यसाधारण महत्त्व जाणून घेताना विद्यार्थिनींना इतिहास केवळ पाठ्यपुस्तकापुरता मर्यादित न राहता तो प्रत्यक्ष स्थळांच्या माध्यमातून अनुभवण्याची संधी मिळाली.सहलीदरम्यान विद्यार्थिनींना देवगिरी किल्ल्याचा इतिहास, त्याची स्थापत्यवैशिष्ट्ये, भौगोलिक रचना, संरक्षणव्यवस्था आणि ऐतिहासिक महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन व जतन तसेच भावी पिढ्यांसाठी या ऐतिहासिक वारशाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींच्या ऐतिहासिक जिज्ञासेला चालना मिळून इतिहास विषयाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी अधिक व्यापक व चिकित्सक झाली.या ऐतिहासिक सहलीचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल, इतिहास विभागप्रमुख डॉ. सुषमा देशपांडे आणि प्रा. कविश्री देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सहलीच्या यशस्वी आयोजनासाठी इतिहास विभागातील शिक्षकवृंद तसेच संबंधित प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले.विद्यार्थिनींच्या शैक्षणिक ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड देणारी ही ऐतिहासिक सहल ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरली.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903


# बाप

"डोक्यावर पंखा आणि त्याच्या डोक्यातील विचारचक्र दोन्ही सारख्याच वेगाने गरगर फिरत होते." पप्पाने दहा वर्षांपूर्वी घेतलेली गाडी त्याला आठवत होती. ती फार खिळखीळी झाली,त्यांना आता नवी गाडी घ्यायला हवी होती. पण पप्पा दुसरी गाडी घ्यायला तयार नव्हते. तो विचार करत होता की, आपण पप्पाची गाडी एक्सचेंज करू मग आपली गाडी पप्पाला देता येईल आणि आपल्यासाठी ही नवी गाडी येईल. त्याला दसरा सणाला नवी गाडी घ्यायची होती. त्यासाठी लागणारे पैसे त्याने साठवले होते. तरी त्याला अजून चाळीस हजार रुपये कमी पडत होते, त्याला वाटले, पप्पा जवळ पैसे असतील तर आपण ते पैसे टाकून गाडी घेऊन येऊ. विचार करता करता त्याचे मन भूतकाळात गेले.आपण लहान असताना आईवडिल मोठ्या कष्टाने आपल्याला वाढवित होते. आपण जे भोग भोगतो आहे ते आपल्या मुलांच्या वाटेला येवू नये, यासाठी ते धडपडत होते. त्यावेळी घर विटा - पत्र्यांचे अतिशय साधं होतं. त्याला आठवत होते, याच घरात तीन वर्षात तीन वेळा चोरी झाली होती. तिसऱ्या चोरीच्या वेळी तर चोरांना काही सापडले नाही, पापड, लोणच्यासह भांडीकुंडी लांबवली होती. अशी चोरी करणारे ते चोर स्थानिकच आणि निर्धन असावे. एका गरीबाला दुसऱ्या गरीबाच्या घरात काय सापडणार होते? आई धीर देत वडिलांना सांगत होती, "आपण पुन्हा भांडीकुंडी कमावून घेवू, आपले जीव वाचले हेच फार झाले", वडिल तरी दुसरे काय बोलणार? ते शेतावर गेले आणि त्यांनी पळसाच्या पानाचे द्रोण आणि पत्रावळ्या बनवून आणल्या. आईने चोरांच्या तावडीतून राहिलेल्या एका पातेल्यात खिचडी केली होती. पुढचे काही दिवस अतिशय काटकसरीने काढावे लागले. त्यावेळी सगळ्यांचीच गरिबी होती. मदत तरी कुणाला मागणार? आणि कुणाला संकटात टाकून होणारी मदत त्यांना नकोच होती. मदत तरी कुणाला मागायची ? दोन दिवसापूर्वीच त्यांच्या मित्राच्या घरी शेती सुधार बँकेवाले आले होते आणि फक्त अठराशे रुपयांसाठी त्यांच्या घरावरचे पत्रे ओढण्याची भाषा करीत होते. त्या दिवशी ते काका बँकेवाल्यांना पाहून दिवसभर घरीच आले नाही, इतके धास्तावले होते.आपण बँकेकडे कर्ज मागण्यासाठी गेलो होतो की, दु:ख विकत घेण्यासाठी गेलो होतो, तेच त्यांना समजत नव्हतेआणिशासन सुद्धा आताच्या सारखे तेव्हा सातबारे कोरे करण्याची भाषा बोलत नव्हते. तेव्हा विद्युत पंप आलेले नव्हते. सिंचनासाठी डिझेलवर चालणारे इंजिन वापरावे लागत असे. ते घेण्यासाठीही कर्ज घ्यावे लागे, पैसे होते कुणाजवळ? मग ते कर्ज थकले की, बँकाचा तगादा सुरु होई."इकडे आड तिकडे विहीर", अशी परिस्थिती व्हायची! निर्धनता, किती मोठा शाप आहे, हे कळायचे!विहीरतगाई, इंजीन तगाईच्या वसूलीसाठी शेती सुधार बँकेवाले कुणाचाही मुलाहिजा न ठेवता पाणउतारा करित असे. त्यांना कर्जदाराच्या हलाखीच्या परिस्थीतीशी काही देणे घेणे नव्हते. त्या दिवशी त्या काकूने मोठ्या मिनतवाऱ्या करून जप्ती आणलेल्या बँकेवाल्यांना परत पाठवले होते. पण ते पुन्हा येणारच होते. आजचे मरण उद्यावर ढकल्याचा तो प्रकार होता. आता तरी काय वेगळे आहे? तेव्हा बँका श्रीमंत होत्या तर ग्राहक गरीब होते. आता अनेक बँका, पतसंस्था ग्राहकांचेच पैसे पळवून अतीश्रीमंत होत आहेत. काही बँका ग्राहकांचे पैसे न देता बंद पडतात तर काही पैसे घेऊन पळून जातात. जिकडे तिकडे बँकाच बँका झाल्या आहेत.अशाच एका सुदर्श पतसंस्थेत, जी पतसंस्था असूनही स्वत:ला अनेक वर्ष बँक म्हणवून घेत होती - तिच्यात आईच्या नावावर पाच लाख रुपये पप्पानी ठेवले होते. बँकेने खुप गैरव्यवहार केले त्यामूळे बँक बंद झाली. ते पैसेही गेले होते. त्याला कळत होतं, त्यामूळे पप्पाची आर्थिक स्थिती नाजूक झालेली होती.आई जेवणासाठी बोलवत होती पण त्याचे मन थाऱ्यावर नव्हतेच.लग्नात मिळालेले काही दागिने,कपडे चोरांनी लांबवल्यामूळे आईच्या अंगावर एकही दागिना नव्हता. तसंही आई ते दागिने कधीही अंगावर घालत नव्हती. त्याने याविषयी आईला एकदा विचारलं होतं."आई तु एकही दागिना का वापरत नाही?"आई म्हणाली," बेटा आपली परिस्थीती गरिबीची आहे, अंगावर दागिना मिरवण्या पेक्षा तुमचं शिक्षण होणं गरजेचं आहे. शिक्षण झाले तर आपण गरिबीतून बाहेर पडू!" आई म्हणाली होती, "तुम्ही दोघे भाऊ सुखात आहात, मोठे होत आहात, हाच माझ्यासाठी मोठा दागिना आहे,मी सुखात आहे, मला अजून दुसरे काही नको". पण त्याचं समाधान झालं नव्हतं.आईजवळ दागिने नसल्याची खंत त्याला अजूनही वाटत होती.दागिण्यांना खुप पैसे लागणार होते. ते नंतर बघू, मग पप्पांना तरी चांगली गाडी हवी, असे त्याला मनापासून वाटत होते. या गाडीचे शॉकप खिळखिळे झाले होते. वारंवार तिचे काम करावे लागत होते. पप्पांना पाठदुखीचा त्रास व्हायला लागला होता.म्हणून त्याने गाडी घेण्यासाठी पप्पांना चाळीस हजार रुपये मागितले होते.बाकी त्याच्याकडे होते. पप्पा म्हणाले, "सध्या नको, नंतर बघू"! त्यांनी तो विषयच टाळला होता. त्यावर तो काही बोललाच नाही पण त्याला गाडी घ्यायचीच होती. मग त्यासाठी त्याने एका पतसंस्थेकडून साठ हजार रुपये कर्ज घेतले.चाळीस हजार गाडीसाठी आणि विस हजार वडिलांना काही अडचण असेल तर त्यांना देण्यासाठी. अर्थातच ते पैसे तो पप्पांना देण्यासाठी आईकडे ठेवणार होता.त्याने पैसे एका हिरव्या रंगाच्या कॅरीबॅगमधे घरी आणून ठेवले.चार दिवसानंतर तेथे पैसे पाहिले,तर नव्हते. त्याने घरात सगळ्यांना विचारले, पण कुणीही ते पाहिले नव्हते.घरात कुणावर संशय घेण्याचे कारण नाही, कुणीही खोटे बोलण्याचा प्रश्नच नव्हता. सगळ्यांनी पैसे शोधले पण सापडले नाही. तो कुणाला काही बोलत नव्हता पण त्यांच्या मनावर प्रचंड ताण असल्याचे सर्वांना जाणवत होते.पप्पा म्हणाले, तुझे पैसे कॅरीबॅगमधे होते का? "एक कॅरीबॅग मी माझी समजून दुकानात घेऊन गेलोय ती तुझी तर नव्हती?" तो म्हणाला, 'पाहून घ्या.'दोन तासानंतर पप्पांचा फोन आला, मी जी कॅरीबॅग घरून आणली ती तुझीच आहे. त्यात पैसे आहेत.साठ हजार रुपये सापडले, सगळ्यांना आनंद झाला. आठ दिवसानंतर तो आपले कपाट आवरत होता. त्यात पुस्तकांच्या मागे पडलेली एक कॅरीबॅग त्याला दिसली त्यात साठ हजार रुपये होते. आपण बँकेतून आणलेले पैसे येथे आहेत तर मग पप्पांनी मला दिलेले पैसे कोणते? त्याने आईला सांगितले, तेव्हा आईच्या डोळ्यात टचकन् पाणी आले.ती म्हणाली, "बेटा! तु पैसे हरवल्याचा जास्त तणाव घेऊ नये, म्हणून त्यांनी दुसरेच पैसे तुला आणून दिले असतील. त्यासाठी त्यांनी कुणाकडे तरी उधार उसनवारी केली असेल". सारा प्रकार त्यांच्या लक्षात आला.गाडी घेण्यासाठी चाळीस हजार रुपये न देणारा बाप, मी तणाव घेऊ नये, म्हणून साठ हजाराची उसनवारी करतो.त्याचे डोळे अश्रूंनी डबडबले, मनात आले बाप तो बापच असतो!


**- दत्ता मोरस्कर रामनगर,**
**(ता.कन्नड)**
**मो.8888022123**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० सप्टेंबर २०२६


# वृद्धत्व : आधाराची नव्हे, सन्मानाची गरज - डॉ. राजेंद्र बगाटे

दरवर्षी १ ऑक्टोबर हा दिवस ‘आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन’ म्हणून साजरा केला जातो. वृद्ध व्यक्तींचे हक्क, आरोग्य, सुरक्षितता, आर्थिक स्वावलंबन, सामाजिक सहभाग आणि सन्मानपूर्वक जगण्याचा अधिकार यांविषयी जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने १४ डिसेंबर १९९० रोजी १ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन म्हणून घोषित केला. वाढते आयुर्मान आणि वृद्ध लोकसंख्येचे वाढते प्रमाण यामुळे वृद्धत्वाचा प्रश्न आता केवळ कुटुंबापुरता मर्यादित राहिलेला नाही; तो आरोग्य, सामाजिक सुरक्षा, अर्थव्यवस्था, निवास, मानवी हक्क आणि सार्वजनिक धोरणांशी जोडलेला व्यापक सामाजिक प्रश्न बनला आहे. त्यामुळे या दिनाचे महत्त्व वृद्ध व्यक्तींना शुभेच्छा देण्यापुरते मर्यादित न ठेवता वृद्धत्वाकडे पाहण्याच्या सामाजिक दृष्टिकोनाचा पुनर्विचार करण्यात आहे.वृद्धत्व हा जीवनाचा नैसर्गिक टप्पा आहे; तो आजार किंवा व्यक्तीच्या उपयुक्ततेचा अंत नाही. वयानुसार शारीरिक क्षमतांमध्ये बदल होऊ शकतात, परंतु आयुष्यभराच्या अनुभवातून निर्माण झालेले ज्ञान, सामाजिक जाण, निर्णयक्षमता आणि जीवनदृष्टी ही वृद्ध व्यक्तीची मोठी संपत्ती असते. कुटुंबासाठी आयुष्यभर श्रम करणाऱ्या, मुलांचे संगोपन करणाऱ्या आणि विविध सामाजिक बदलांचे साक्षीदार असलेल्या वृद्धांच्या योगदानाकडे केवळ ‘काळजी घेण्याची गरज असलेली व्यक्ती’ या चौकटीत पाहणे अन्यायकारक ठरते. रोजगारातून निवृत्ती घेतल्यानंतर व्यक्तीची सामाजिक भूमिका संपत नाही. उलट, अनुभवाच्या आधारे पुढील पिढीला मार्गदर्शन करण्याची तिची क्षमता अधिक महत्त्वाची ठरू शकते.भारतीय समाजात संयुक्त कुटुंबपद्धतीमुळे वृद्धांना कुटुंबाच्या दैनंदिन जीवनात महत्त्वाचे स्थान होते. अनेक पिढ्या एकत्र राहत असल्याने आजी-आजोबांचा नातवंडांशी संवाद, घरातील निर्णयांमध्ये सहभाग आणि परंपरांचे हस्तांतरण सहज घडत असे. मात्र, नागरीकरण, औद्योगिकीकरण, शिक्षण व रोजगारासाठी स्थलांतर आणि बदलती जीवनशैली यामुळे कुटुंबरचना बदलली आहे. लहान कुटुंबांचे प्रमाण वाढले असून तरुण पिढी शिक्षण किंवा रोजगारासाठी दूरवर स्थायिक होत आहे. त्यामुळे वृद्ध पालक आणि मुलांमध्ये भौगोलिक अंतर वाढले आहे. तंत्रज्ञानामुळे संपर्क शक्य झाला असला तरी प्रत्यक्ष सहवास, संवाद आणि भावनिक जवळीक यांची पूर्ण भरपाई तंत्रज्ञान करू शकत नाही.यामुळे वृद्धांच्या जीवनातील एकटेपणाचा प्रश्न गंभीर होत आहे. घरात माणसे असूनही आपले म्हणणे ऐकून घेणारा कोणी नाही, निर्णयांमध्ये आपले मत विचारले जात नाही किंवा आपल्या भावनांना पुरेसा प्रतिसाद मिळत नाही, अशी अवस्था मानसिक एकाकीपणाला जन्म देऊ शकते. विशेषतः जोडीदाराच्या निधनानंतर किंवा मुलांचे स्थलांतर झाल्यानंतर ही पोकळी अधिक तीव्र होते. वृद्धांची काळजी म्हणजे केवळ अन्न, औषधे आणि निवारा देणे नव्हे; त्यांना वेळ देणे, त्यांचे म्हणणे ऐकणे, त्यांच्या आवडी-निवडींचा आदर करणे आणि कुटुंबातील त्यांचे स्थान कायम ठेवणे तितकेच आवश्यक आहे. भावनिक सहवास ही वृद्धत्वातील मूलभूत गरज आहे.आरोग्य हा वृद्धत्वातील आणखी एक केंद्रस्थानी असलेला प्रश्न आहे. वाढत्या वयाबरोबर दृष्टी व श्रवणक्षमता कमी होणे, सांधेदुखी, हाडांची झीज, हालचालींवरील मर्यादा, रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार आणि इतर दीर्घकालीन आजार उद्भवू शकतात. त्यामुळे वृद्धांसाठी आरोग्यव्यवस्था उपचारांपुरती मर्यादित न ठेवता नियमित तपासणी, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, पोषण, योग्य शारीरिक हालचाल, औषधांचे व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य यांचा समावेश करणारी असावी. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्यसेवा सुलभ करणे आणि आवश्यकतेनुसार तज्ज्ञ उपचारांपर्यंत पोहोच सुनिश्चित करणे विशेष महत्त्वाचे आहे. वृद्ध व्यक्तीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे तिच्या जीवनमानाकडे दुर्लक्ष करणे होय.शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्याचीही काळजी आवश्यक आहे. निवृत्तीनंतरची बदललेली दिनचर्या, सामाजिक भूमिका कमी होणे, आर्थिक चिंता, जोडीदाराचा मृत्यू, मुलांपासून वाढलेले अंतर किंवा दीर्घकालीन आजार यांमुळे मानसिक ताण निर्माण होऊ शकतो. अनेक वृद्ध आपला त्रास व्यक्त न करता तो सहन करतात. ‘वय झाले की असे होते’ या समजुतीमुळे त्यांच्या मानसिक समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते. प्रत्यक्षात संवाद, सामाजिक सहभाग, छंद, सांस्कृतिक उपक्रम आणि आवश्यकतेनुसार समुपदेशन यांमुळे वृद्धांच्या मानसिक स्वास्थ्याला आधार मिळू शकतो. मानसिक आरोग्याला शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्व देणे ही काळाची गरज आहे.वृद्धत्वातील आर्थिक सुरक्षितता हा स्वाभिमानाशी संबंधित प्रश्न आहे. संघटित क्षेत्रातील निवृत्तीवेतनधारकांना नियमित उत्पन्नाचा आधार असू शकतो; परंतु असंघटित क्षेत्रात आयुष्यभर काम केलेल्या शेतमजूर, लहान शेतकरी, घरगुती कामगार, बांधकाम कामगार आणि छोट्या व्यवसायांवर अवलंबून असलेल्या व्यक्तींसाठी वृद्धापकाळातील आर्थिक स्थैर्य अधिक कठीण असते. बचतीचा अभाव, नियमित उत्पन्न नसणे आणि आरोग्यखर्चाचा वाढता भार यामुळे असुरक्षितता वाढू शकते. त्यामुळे सामाजिक सुरक्षा, निवृत्तीवेतन, आरोग्य संरक्षण आणि इतर कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र वृद्धांपर्यंत सहज व वेळेवर पोहोचणे आवश्यक आहे. वृद्धांची आर्थिक सुरक्षितता ही दया नसून सामाजिक न्यायाचा विषय आहे.वृद्ध व्यक्तींवरील अत्याचार हा समाजासमोरील गंभीर प्रश्न आहे. शारीरिक हिंसेबरोबर मानसिक छळ, अपमान, दुर्लक्ष, आर्थिक शोषण, मालमत्तेवर दबाव आणणे किंवा औषधोपचार व मूलभूत गरजा नाकारणे अशा विविध स्वरूपांत अत्याचार होऊ शकतात. कुटुंबातील व्यक्तींवर अवलंबून राहण्याची परिस्थिती असल्याने अनेक वृद्ध तक्रार करण्यास घाबरतात. त्यामुळे कायदेशीर संरक्षणाबरोबरच तक्रार नोंदविण्याची सुलभ व्यवस्था, सामाजिक जागरूकता आणि गरजूंना तातडीची मदत उपलब्ध होणे आवश्यक आहे. वृद्धांच्या सन्मानाचे रक्षण करणे हे त्यांच्या मूलभूत मानवी अधिकारांचे संरक्षण करण्याशी जोडलेले आहे.वृद्ध महिलांच्या प्रश्नांकडेही स्वतंत्रपणे पाहणे गरजेचे आहे. आयुष्यभर घर आणि कुटुंबाची जबाबदारी सांभाळलेल्या अनेक महिलांकडे स्वतंत्र आर्थिक साधने मर्यादित असतात. पतीच्या निधनानंतर त्यांची आर्थिक व सामाजिक असुरक्षितता वाढू शकते. विशेषतः ग्रामीण भागात आरोग्यसेवा, वाहतूक, बँकिंग आणि शासकीय योजनांपर्यंत पोहोचताना त्यांना अतिरिक्त अडचणी येऊ शकतात. त्यामुळे वृद्ध महिलांना आर्थिक स्वावलंबन, सुरक्षितता, आरोग्यसेवा आणि निर्णयप्रक्रियेत सहभागाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.ग्रामीण आणि शहरी वृद्धांचे प्रश्नही त्यांच्या परिस्थितीनुसार बदलतात. ग्रामीण भागात सामाजिक संबंध आणि शेजारधर्माचा आधार असला तरी आरोग्यसेवा, वाहतूक व आर्थिक सुविधा मर्यादित असू शकतात. शहरांमध्ये विविध सुविधा उपलब्ध असूनही वेगवान जीवनशैली, महागडे जीवनमान आणि सामाजिक तुटकपणा यांमुळे एकटेपणाची समस्या वाढू शकते. म्हणून वृद्धांसाठी एकच उपाय सर्वत्र लागू करण्याऐवजी स्थानिक गरजांनुसार सेवा विकसित करणे आवश्यक आहे. वृद्धस्नेही सार्वजनिक व्यवस्था उभारण्यासाठी सुरक्षित पदपथ, बसण्याची ठिकाणे, सुलभ वाहतूक, सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि सहज उपलब्ध आरोग्यसेवा यांचा विचार केला पाहिजे.डिजिटल युगात वृद्धांसाठी तंत्रज्ञान हे संधीचे साधनही आहे आणि आव्हानही. मोबाईल व संगणकाच्या माध्यमातून बँकिंग, शासकीय सेवा, आरोग्यविषयक माहिती आणि दूरस्थ संवाद सहज शक्य झाला आहे. मात्र डिजिटल साधनांचा पुरेसा परिचय नसल्यामुळे काही वृद्ध या सुविधांपासून दूर राहतात. त्याचवेळी बनावट दूरध्वनी, संदेश, फसवे दुवे आणि आर्थिक आमिषांद्वारे डिजिटल फसवणुकीचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे वृद्धांना डिजिटल साक्षर करण्याबरोबरच सुरक्षित व्यवहार, गोपनीय माहितीचे संरक्षण आणि संशयास्पद संदेशांची पडताळणी यांचेही प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. कुटुंबातील तरुणांनी वृद्धांना तंत्रज्ञानापासून दूर ठेवण्याऐवजी त्याचा सुरक्षित वापर शिकविणे ही पिढ्यांमधील सहकार्याची नवी दिशा ठरू शकते.वृद्ध व्यक्ती समाजाच्या सामूहिक स्मृतीच्या महत्त्वाच्या वाहक आहेत. स्थानिक इतिहास, पारंपरिक शेती, लोककला, बोलीभाषा, लोकपरंपरा, सामाजिक बदल आणि जीवनसंघर्ष यांचे अनुभव त्यांच्या स्मरणात जतन झालेले असतात. आधुनिकतेच्या वेगात या अनुभवांचे दस्तऐवजीकरण न झाल्यास मौल्यवान सामाजिक ज्ञान नष्ट होऊ शकते. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना वृद्धांशी संवाद साधण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्यास पिढ्यांमधील दरी कमी होईल आणि मौखिक इतिहासाचे जतनही करता येईल. वृद्धांच्या अनुभवाकडे भूतकाळातील आठवणी म्हणून नव्हे, तर वर्तमानाला दिशा देणाऱ्या सामाजिक संपत्ती म्हणून पाहण्याची गरज आहे.वृद्धत्व म्हणजे निष्क्रियता असा समजही बदलला पाहिजे. आपल्या क्षमता आणि इच्छेनुसार वृद्धांना सामाजिक उपक्रम, वाचन, लेखन, कला, संगीत, बागकाम, मार्गदर्शन, सामाजिक सेवा किंवा अनुभवाधारित कार्यात सहभागी होता येते. काही वृद्धांना निवृत्तीनंतरही काम करण्याची इच्छा असते; त्यांच्या आरोग्याचा आणि क्षमतेचा विचार करून सन्मानजनक संधी उपलब्ध करून देता येतात. यामुळे आत्मविश्वास वाढतो आणि समाजालाही त्यांच्या अनुभवाचा लाभ मिळतो. वृद्धांना केवळ मदतीचे लाभार्थी न मानता सामाजिक सहभागाचे अधिकार असलेले नागरिक म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे.वृद्धांच्या प्रश्नांवर शासन आणि कुटुंबाबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्यव्यवस्था, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांनीही काम करणे गरजेचे आहे. सामाजिक सुरक्षा योजनांचा प्रभावी लाभ, आरोग्यसेवा, सुरक्षित निवास, सार्वजनिक सुविधांची सुलभता, समुपदेशन आणि सामाजिक संवादाची साधने उपलब्ध झाली तर वृद्धांचे जीवन अधिक सुरक्षित होऊ शकते. मात्र धोरणे आणि योजना कितीही चांगल्या असल्या तरी त्यांची परिणामकारकता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर अवलंबून असते. वृद्ध व्यक्तीला कार्यालये, रुग्णालये किंवा शासकीय यंत्रणांमध्ये सन्मानाने वागणूक मिळणे हीदेखील कल्याणाचीच बाब आहे.या सर्व प्रक्रियेत कुटुंबाची भूमिका सर्वाधिक जवळची आणि प्रभावी आहे. वृद्ध आई-वडिलांना आर्थिक मदत करणे पुरेसे नाही; त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या निर्णयस्वातंत्र्याचा आदर करणे, आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांना कौटुंबिक जीवनात सहभागी करून घेणे आवश्यक आहे. वृद्ध व्यक्तीला ‘तुमचे वय झाले’ असे वारंवार जाणवून देण्यापेक्षा ‘तुमचा अनुभव आमच्यासाठी महत्त्वाचा आहे’ ही भावना देणे अधिक मोलाचे आहे. पिढ्यांमधील संवाद वाढला तर वृद्धांच्या मानसिक गरजा पूर्ण होण्याबरोबरच तरुण पिढीलाही जीवनातील अनुभव आणि मूल्यांची समृद्ध जाण मिळू शकते.आज वृद्धत्वाचा प्रश्न लोकसंख्येतील बदलाशीही जोडला गेला आहे. आयुर्मान वाढत असताना वृद्ध व्यक्तींची संख्या वाढत आहे. त्यामुळे भविष्यातील समाजरचनेत आरोग्य, सामाजिक सुरक्षा, निवास, दीर्घकालीन काळजी, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक सहभाग यांचे नियोजन करणे आवश्यक ठरणार आहे. अधिक वर्षे जगणे ही मानवी प्रगतीची उपलब्धी आहे; परंतु त्या वर्षांना आरोग्य, स्वायत्तता, सुरक्षितता आणि प्रतिष्ठेची जोड मिळाली तरच दीर्घायुष्य अर्थपूर्ण ठरते. वृद्ध लोकसंख्या ही केवळ आव्हान नसून अनुभव, कौशल्य आणि सामाजिक स्मृतीचा मोठा स्रोतही आहे.१ ऑक्टोबरचा आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन म्हणूनच एका दिवसाच्या औपचारिक कार्यक्रमापुरता मर्यादित राहू नये. आपल्या घरातील वृद्ध व्यक्तीशी आपण किती संवाद साधतो, तिचे मत किती ऐकतो, तिच्या आरोग्याची किती काळजी घेतो आणि तिच्या अनुभवाला किती स्थान देतो, याचा विचार या निमित्ताने झाला पाहिजे. वृद्धांना दयेची नव्हे, तर सन्मानाची गरज आहे; केवळ संरक्षणाची नव्हे, तर स्वायत्ततेची गरज आहे; केवळ सहानुभूतीची नव्हे, तर सामाजिक सहभागाची संधी आवश्यक आहे. वृद्धत्वाकडे ओझे म्हणून पाहणारी मानसिकता बदलून अनुभवसंपन्न जीवनाचा परिपक्व टप्पा म्हणून त्याचा स्वीकार करणे ही अधिक संवेदनशील समाजाची खूण आहे.वास्तविक पाहता वृद्ध व्यक्तींचा सन्मान हा एका पिढीपुरता प्रश्न नाही. ज्यांनी कुटुंब आणि समाजाच्या उभारणीत आयुष्य घालविले, त्यांच्या जीवनाच्या उत्तरार्धात सुरक्षितता, आपलेपणा आणि प्रतिष्ठा मिळणे ही सामूहिक जबाबदारी आहे. वृद्धत्वाला दुर्बलतेशी जोडण्याऐवजी अनुभव, ज्ञान आणि सामाजिक योगदानाशी जोडले पाहिजे. कारण वृद्ध व्यक्तींच्या आयुष्यात केवळ गेलेल्या काळाच्या आठवणी नसतात, तर पुढील पिढ्यांना दिशा देणारे अनुभवही असतात. म्हणूनच वृद्धत्वाचा सन्मान म्हणजे अनुभवाचा सन्मान आणि अनुभवाचा सन्मान म्हणजे माणुसकीचा सन्मान होय.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**bagate.rajendra5@gmail.com**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० सप्टेंबर २०२६

# 'दलित आरक्षण: भूमिका आणि वाटचाल'

# संविधानाच्या प्रकाशात आरक्षणाचे अंतरंग




प्रा.डॉ.नारायण कांबळे आणि प्रा.डॉ.प्रियदर्शन भवरे यांनी संपादित केलेला 'दलित : आरक्षण भूमिका आणि वाटचाल' हा ग्रंथ हातात घेतल्यावर सर्वप्रथम जाणवते ती त्याची विषयाकडे पाहण्याची व्यापक दृष्टी. आरक्षण म्हटले की आपल्या सार्वजनिक चर्चेत 'मेरिट', 'संधी', 'अन्याय', 'टक्केवारी', 'लाभार्थी' असे अनेक शब्द एकाच वेळी पुढे येतात. खुल्या प्रवर्गातील एखाद्या घटकाला आरक्षणामुळे आपल्या गुणवत्तेवर अन्याय होत असल्याचे वाटू शकते; तर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या घटकाला अपेक्षित प्रतिनिधित्व अद्याप मिळालेले नाही, असे वाटू शकते. अनुसूचित जातींच्या आरक्षणातही काही घटकांकडून अंतर्गत वाटपाचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. म्हणजेच प्रत्येकाच्या अनुभवात काही ना काही सत्य दडलेले आहे. मात्र प्रश्न असा आहे की, या विविध अनुभवांकडे आपण एकत्रितपणे, सामाजिक इतिहासाच्या आणि संविधानात्मक दृष्टिकोनाच्या आधारे पाहतो का? हा ग्रंथ वाचकाला नेमक्या याच ठिकाणी थांबवतो. वंचितता, शोषण आणि सामाजिक न्याय या संदर्भातील संविधानात्मक बाबींचे आकलन संकुचित भावनांच्या पलीकडे जाऊन करणे आवश्यक आहे, अशी दिशा ग्रंथातील विविध लेख देतात. आरक्षण ही केवळ काही जागांची विभागणी नाही. त्यामागे प्रदीर्घ सामाजिक इतिहास आहे; वंचिततेचा अनुभव आहे आणि संविधानाने स्वीकारलेली सामाजिक न्यायाची भूमिका आहे. या मूलभूत जाणिवेतून आरक्षणाकडे पाहण्याची दृष्टी हा ग्रंथ विकसित करतो. म्हणूनच आरक्षणाकडे 'एखाद्याला दिलेली सवलत' म्हणून पाहण्याऐवजी सामाजिक प्रतिनिधित्व आणि संधींच्या पुनर्रचनेचे धोरण म्हणून पाहण्याची गरज अधोरेखित होते. शतकानुशतके काही समूहांना शिक्षण, सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठेच्या संधींपासून दूर ठेवण्यात आले असेल, तर समानतेच्या प्रवासाचे मोजमाप केवळ आजच्या दिवसापासून करणे पुरेसे ठरेल का? हा प्रश्न आरक्षणाच्या चर्चेच्या मुळाशी आहे. आरक्षणाच्या विरोधातील चर्चेत 'मेरिट' हा शब्द अत्यंत प्रभावीपणे वापरला जातो. मात्र मेरिट निर्माण होण्यामागील सामाजिक परिस्थितीचा विचार आपण किती करतो? चांगली शाळा, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे वातावरण, आर्थिक स्थैर्य, घरातील शैक्षणिक परंपरा, पालकांचे मार्गदर्शन, तंत्रज्ञानाची उपलब्धता, स्पर्धात्मक परीक्षांसाठीची तयारी, योग्य मार्गदर्शन आणि सामाजिक वातावरण — या सर्व घटकांचा एखाद्याच्या शैक्षणिक यशावर परिणाम होत असतो. मग मेरिट म्हणजे केवळ परीक्षेत मिळालेले गुण एवढीच तिची व्याख्या करता येईल का? हा प्रश्न या ग्रंथाच्या एकूण चर्चेतून प्रकर्षाने समोर येतो. आरक्षण केवळ शैक्षणिक प्रवेशापुरते असावे आणि त्याचा विस्तार नोकरी किंवा इतर क्षेत्रांपर्यंत होऊ नये, असा युक्तिवाद केला जातो. परंतु शिक्षणात प्रवेश मिळाल्यानंतर सामाजिक प्रतिनिधित्वाच्या पुढील पायऱ्यांवर समान संधी उपलब्ध झाल्या नाहीत, तर केवळ प्रवेशाची समानता व्यापक सामाजिक समानतेत रूपांतरित होईल का? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कारण आरक्षणाचा प्रश्न केवळ 'कोणाला प्रवेश मिळाला?' एवढाच नाही. तर 'कोणाला निर्णयप्रक्रियेत स्थान मिळाले?', 'कोणाचे प्रतिनिधित्व निर्माण झाले?' आणि 'सामाजिक संस्थांमध्ये कोणाचा आवाज पोहोचला?' हाही तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे. भारतीय संविधानातील समतेच्या तत्त्वाचा विचार करताना समानता म्हणजे सर्वांना अगदी एकसारखे वागवणे एवढाच तिचा अर्थ नाही. ज्यांची सुरुवातच वेगवेगळ्या सामाजिक परिस्थितीतून झाली आहे, त्यांना प्रत्यक्ष समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी काही विशेष उपायांची आवश्यकता भासू शकते. म्हणून आरक्षण आणि समानता हे परस्परविरोधी आहेत की समानतेच्या व्यापक उद्दिष्टाकडे जाणाऱ्या परस्पर संबंधित संकल्पना आहेत, हा प्रश्न संविधानाच्या संदर्भात समजून घेणे आवश्यक ठरते. यामुळे आरक्षणाची चर्चा केवळ राजकीय घोषणांची चर्चा राहत नाही; ती संविधानातील समानता, सामाजिक न्याय आणि प्रतिनिधित्व या मूलभूत मूल्यांची चर्चा बनते. आरक्षणामुळे शिक्षण आणि रोजगाराच्या काही क्षेत्रांत संधी वाढल्या असतील आणि प्रतिनिधित्व निर्माण झाले असेल; परंतु त्यातून सामाजिक विषमता पूर्णपणे संपली का? या प्रश्नाचे उत्तर केवळ होय किंवा नाही असे देता येणार नाही. आरक्षणाने काही प्रमाणात दारे उघडली असली तरी व्यापक सामाजिक परिवर्तनासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, आर्थिक संधी, सामाजिक प्रतिष्ठा, भेदभावमुक्त वातावरण आणि सार्वजनिक जीवनातील समान सहभाग या बाबींचीही आवश्यकता असते. म्हणून आरक्षणाची उपलब्धी आणि सामाजिक समतेचे अंतिम ध्येय यांची गल्लत करता कामा नये. आरक्षण हे सामाजिक परिवर्तनाच्या व्यापक प्रक्रियेतील एक महत्त्वाचे साधन आहे; परंतु सामाजिक समानतेचा प्रवास त्यापेक्षा अधिक व्यापक आहे. आरक्षणाबाबत समाजात अनेक समज-गैरसमज प्रचलित आहेत. काही प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित आहेत, काही अर्धवट माहितीवर, तर काही ऐकीव धारणांवर. एखाद्या व्यक्तीचा अनुभव महत्त्वाचा असतो; परंतु तो संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करतोच असे नाही. म्हणूनच आरक्षणासारख्या व्यापक सामाजिक प्रश्नावर चर्चा करताना वैयक्तिक अनुभवाबरोबर इतिहास, सामाजिक परिस्थिती, आकडेवारी आणि संविधानिक चौकट यांचाही विचार करणे आवश्यक आहे. या जाणिवेचे भान हा ग्रंथ वाचताना प्रकर्षाने येते. ग्रंथाचा पुढील प्रवास अधिक संवेदनशील आणि गुंतागुंतीच्या प्रश्नाकडे वळतो — अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरण. येथे प्रश्न आणखी सूक्ष्म होतो. अनुसूचित जातींच्या एकत्रित आरक्षणाचा लाभ सर्व घटकांना समान प्रमाणात मिळाला आहे का? काही घटक तुलनेने पुढे गेले आणि काही अजूनही मागे राहिले असतील, तर मागे राहिलेल्या घटकांसाठी स्वतंत्र अंतर्गत वाटपाचा विचार करणे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने योग्य ठरेल का? की अशा प्रकारचे वर्गीकरण केल्यामुळे आधीच सामाजिक अन्यायाचा सामना करणाऱ्या समाजातील अंतर्गत विभागणी अधिक तीव्र होईल? ग्रंथातील उपवर्गीकरणासंदर्भातील लेख या गुंतागुंतीच्या प्रश्नाभोवती विचारांची अनेक दालने उघडतात. उपवर्गीकरणाच्या चर्चेतून एक महत्त्वाची चिंता पुढे येते — आरक्षणाचा लाभ सर्वांत वंचित घटकांपर्यंत पोहोचतो आहे का? जर आरक्षित प्रवर्गातील काही समूहांना तुलनेने अधिक प्रतिनिधित्व मिळत असेल आणि काही समूह सातत्याने मागे राहत असतील, तर त्या अंतर्गत विषमतेचा विचार करणे आवश्यक आहे, अशी भूमिका या चर्चेतून समोर येते. ही भूमिका आरक्षणाच्या चौकटीतही अधिक समतोल प्रतिनिधित्वाचा शोध घेते. परंतु दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींच्या सामूहिक सामाजिक अस्मितेवर काय परिणाम होईल? अंतर्गत जातीय स्पर्धा वाढेल का? आरक्षणाच्या मूळ सामाजिक न्यायाच्या उद्देशाला दुय्यम स्थान मिळेल का? जातीआधारित संघर्षाला नवे रूप प्राप्त होईल का? दलित अस्मितेचे संभाव्य विखंडन, जातीआधारित संघर्ष आणि त्याचे दीर्घकालीन सामाजिक परिणाम या संदर्भातील चिंता याच प्रश्नांतून पुढे येतात. म्हणून उपवर्गीकरणाचा प्रश्न केवळ टक्केवारीचा नाही. तो प्रतिनिधित्व, समानता, सामाजिक न्याय, संविधानिक चौकट आणि सामूहिक अस्मिता या सर्वांचा प्रश्न आहे. उपवर्गीकरणाच्या प्रश्नाला सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे नवे संविधानिक परिमाण प्राप्त झाले आहे. या संदर्भातील लेखांमध्ये समानतेचे तत्त्व, आरक्षणाची संविधानिक चौकट आणि सामाजिकदृष्ट्या वंचित समूहांतील अंतर्गत विषमता यांचा विचार केंद्रस्थानी येतो. येथे पुन्हा एक मूलभूत प्रश्न समोर येतो — सर्वांना समान मानणे म्हणजे सर्वांचे वाटप अगदी एकाच पद्धतीने करणे, की प्रत्यक्ष वंचिततेचा विचार करून संधी अधिक न्याय्य पद्धतीने उपलब्ध करून देणे? या प्रश्नाचे उत्तर सोपे नाही. म्हणूनच उपवर्गीकरणावरील चर्चा भावनिक घोषणांपुरती मर्यादित न राहता संविधानिक मूल्ये, सामाजिक वास्तव, प्रतिनिधित्व आणि वंचिततेचे अनुभव यांच्या संगमावर करणे आवश्यक आहे, असा विचार हा ग्रंथ पुढे आणतो. हा ग्रंथ वाचताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते — आपण आरक्षणावर चर्चा करतो असे वाटत असले तरी प्रत्यक्षात आपण भारतीय समाजरचनेवरच चर्चा करत असतो. आरक्षणाचा जन्म ज्या सामाजिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर झाला, ती विषमता समजून घेतल्याशिवाय आरक्षण समजणार नाही. 'मेरिट' समजून घ्यायची असेल तर संधींची विषमता समजून घ्यावी लागेल. 'समानता' समजून घ्यायची असेल तर ऐतिहासिक विषमता समजून घ्यावी लागेल. 'उपवर्गीकरण' समजून घ्यायचे असेल तर आरक्षणाच्या लाभाचे अंतर्गत वितरण समजून घ्यावे लागेल. आणि 'सामाजिक न्याय' समजून घ्यायचा असेल तर संविधानाच्या मूलभूत मूल्यांकडे नव्याने पाहावे लागेल. या अर्थाने या ग्रंथाचे वैशिष्ट्य असे की तो आरक्षणाचा प्रश्न एका बाजूने मांडून थांबत नाही. आरक्षणाचे धोरण, त्यामागील सामाजिक पार्श्वभूमी, संविधानातील समानतेचे तत्त्व, आरक्षणाचे लाभार्थी, सामाजिक समतेची परिणामकारकता, राजर्षी शाहू महाराजांचा सामाजिक न्यायाचा वारसा, आरक्षणविषयीचे समज-गैरसमज, जागतिक संदर्भ आणि उपवर्गीकरणासारखे समकालीन प्रश्न — या सर्वांना एकाच वैचारिक पटावर आणण्याचा प्रयत्न या ग्रंथात दिसून येतो. त्यामुळे हा ग्रंथ केवळ आरक्षणावरील लेखांचा संग्रह म्हणून न वाचता, आरक्षण समजून घेण्यासाठी सुरू केलेला एक व्यापक वैचारिक संवाद म्हणून वाचला, तर त्याचे महत्त्व अधिक स्पष्ट होते. शेवटचे काही शब्द... प्रा. डॉ. नारायण कांबळे सरांनी हातात दिलेल्या या ग्रंथाचे ऋण शब्दांत फेडणे शक्य नाही. मात्र एका चांगल्या पुस्तकाचे खरे ऋण कदाचित त्यावर लिहून नव्हे, तर त्यातून मिळालेला विचार पुढे नेऊन फेडता येते. या ग्रंथाने आरक्षणाकडे पाहण्याची माझी दृष्टी अधिक व्यापक केली. काही प्रश्नांची उत्तरे दिली, तर काही प्रश्न अधिक गंभीरपणे विचारायला शिकवले. आणि म्हणूनच सरांच्या आग्रहाखातर केलेला हा छोटासा लेखनप्रपंच... या लेखातील नवखेपणा वाचक समजून घेतील, अशी अपेक्षा.

**पुस्तकाचे नाव : 'दलित आरक्षण: भूमिका आणि वाटचाल'**
**लेखक: प्रा.डॉ.नारायण कांबळे / प्रा.डॉ.प्रियदर्शन भवरे**
**प्रकाशक: सौरव प्रकाशन, संभाजीनगर**
**किमत: ६५०**

**बालाजी तुरेवाले, रोकडासावरगाव.**
**ता. अहमदपूर, जि. लातूर**